CNR NO - MHCH090002922024

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | : | १८.०३.२०२४ |
| नोंदणी दिनांक | : | १८.०३.२०२४ |
| निकाल दिनांक | : | २८.०५.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिने दिवस<br>०२ ०२ १० |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, गोंडपिपरी यांचे न्यायालय, ता. गोंडपिपरी, जि. चंद्रपूर

(पिठासीन अधिकारी यु. पी. शिंदे)

सं.फौ.प्र.क्र. २२४/२०२४ निशाणी क्र.१५

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस स्टेशन अधिकारी,
उप-पोलीस स्टेशन धाबा,
ता. गोंडपिपरी, जिल्हा. चंद्रपूर ....अभियोगपक्ष

-विरुध्द-

शालीक नारायण आत्राम,
वय- ३८ वर्षे, व्यवसाय – शेती
रा. चिवंडा, ता. गोंडपिपरी,
जि. चंद्रपूर ......आरोपी

गुन्हाः महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ **(ई)** अन्वये

अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ - श्री. आर.बी.धात्रक
आरोपीतर्फे विधिज्ञ - श्री. आर.एम.कांबळे

## न्यायनिर्णय

(घोषीत दिनांक २८ मे, २०२६ रोजी)

प्रस्तुत प्रकरणात आरोपी महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये संपरिक्षेचा सामना करीत आहे.

**०२.** प्रस्तुत प्रकरणात गु.र.क्र./२१/२०२४ पोलीस स्टेशन, धाबा ता. गोंडपिपरी येथे नोंदवून तपास श्री. सुरेश बोरकुटे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदवीले व आरोपीविरुद्ध दोषारोपपत्र दाखल केले.

०३. माझे विद्वान पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९, कलम ६५(ई) अन्वये गुन्ह्याचा तपशील नि.क्र.१२ वर नोंदविला. आरोपीने प्रतिकथन नाकारल्यामुळे त्याचेविरुद्ध खटला चालविण्यात आला.

०४. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला. निर्णीतीसाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमिमांसा पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिद्ध करतो काय की, दि. १०/०३/२०२४ रोजी १७.०० ते १७.३० वाजेच्या सुमारास मौजा चिवंडा, ता. गोंडपिपरी, जिल्हा चंद्रपूर येथे आरोपी त्याचे ताब्यात एकुण १४ नग प्रत्येकी ९० मि.ली. देशी रॅाकेट संत्रा दारू विनापरवाना व अवैधरित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगून असतांना मिळून आला ? | नाही |
| २. | आदेश काय ? | **अंतिम आदेशानुसार** |

<u>का र ण मि मां सा</u>

०५. आरोपीविरुद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता अभियोग पक्षातर्फे पंच साक्षीदार सा.क्र.१ दिलीप देवाजी सोयाम यांची साक्ष नोंदविण्यात आली. अभियोग पक्षास पुरेशी संधी देऊनही अभियोग पक्ष इतर साक्षीदारांना हजर ठेऊन त्यांचा साक्षपुरावा नोंदविण्यास असमर्थ ठरला. करीता, <u>नि.क्र.१</u> वर आदेश पारीत करुन सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

०६. आरोपीविरूद्ध अभिलेखावर कोणताही गुन्हादर्शक पुरावा आलेला नसल्यामुळे त्याचे फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन वगळण्यात आले.

<u>मुद्दा क्र.१ करीता</u> :-

०७. साक्षदार क्र.१ दिलीप देवाजी सोयाम हे पंच साक्षिदार असून त्यांनी सरतपासादरम्यान अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. याउलट, घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यांवर त्यांच्या सह्या असल्याचे कथन केलेले आहे. परंतु, त्यातील मजूकराबाबत अनभिज्ञता दर्शविली. सा.क्र.१ दिलीप यांनी त्यांचे पुर्वकथनानुरूप साक्ष दिलेली नाही. त्यामुळे, त्यांच्या साक्षिपुराव्या आधारे अभियोग पक्ष आरोपीविरूद्धचा गुन्हा सिद्ध करण्याकरीता अपयशी ठरला.

०८. प्रस्तुत खटल्यात आरोपी त्याचे ताब्यात देशी रॅाकेट संत्रा दारु विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना आणि अवैधरित्या बाळगून असतांना मिळून आला, हे

अभियोग पक्षातर्फे सिद्ध करणे अत्यंत महत्वाचे आहे. साक्षीदाराच्या साक्षेचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, पंच साक्षिदार सा.क्र.१ दिलीप यांनी अभियोग पक्षाच्या कथनाला पाठींबा दिलेला नाही. अभियोग पक्षातर्फे रासायनिक पृथ:करणाचा अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे जप्त मुद्देमाल ही दारूच होती ही बाब सिद्ध झालेली नाही. तसेच, सदरहू दारू ही आरोपीच्याच ताब्यातुन जप्त केली होती, ही बाब पुराव्याअभावी सिद्ध होऊ शकली नाही. अभियोग पक्षाने फिर्यादीची साक्ष नोंदविलेली नसल्यामुळे फिर्यादमधील मजकुर, तसेच घटनास्थळ व जप्ती पंचनामे सिद्ध होऊ शकले नाहीत. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपी हे स्वतःजवळ अवैधरित्या दारु बाळगून असतांना मिळून आले होते, ही बाब सिद्ध करण्यास अपयशी ठरला आहे, असे मत नोंदवून मी मुद्दा क्र.१ ते उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u> :-**

**०९.** मुद्दा क्र. १ च्या नकारार्थी निष्कर्षास अनुसरून आरोपी निर्दोष सुटण्यास प्रात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येते.

आदेश

१. आरोपी शालीक नारायण आत्राम यांची फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) खालील आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. जप्त मुद्देमाल एकुण १४ नग प्रत्येकी ९० मि.ली. देशी रॉकेट संत्रा दारू विल्हेवाटीकरीता आवाहनाचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपूर येथे पाठविण्यात यावी.

३. आरोपीचे जात मुचलके व बंधपत्रे रद्द करण्यात येत आहे.

४. आरोपीने रक्कम रू.१५,०००/- चे वैयक्तीक बंधपत्र देऊन फौजदारी प्रकिया संहिता चे कलम ४३७-अ अन्वये पुर्तता करावी.

(न्यायनिर्णय हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

(Sd/-)
**(उमाकांत पी. शिंदे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
गोंडपिपरी

स्थळ :- गोंडपिपरी
दिनांक :- २८/०५/२०२६

## <u>प्र मा ण प त्र</u>

मी प्रमाणित करते की या पि.डी.एफ. करून अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द-नि-शब्द हे मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | उमेश रामप्रसाद आमटे, लघुलेखक श्रेणी-३. |
| न्यायालयाचे नांव | : | न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, गोंडपिपरी. |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | २८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णयावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | २८.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | २८.०५.२०२६ |